# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२६**

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ३**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एन-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण**<br>**रूपये:- ७५,१९,४९,८६,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (१) | १४४२ | १० | सांगोला तालुका हा ग्रामीण व दुष्काळग्रस्त भाग म्हणून ओळखला जात असून येथे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच इतर मागासवर्गीय समाजातील विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. उच्च शिक्षणासाठी या विद्यार्थ्यांना तालुका ठिकाणी किंवा इतर शहरांमध्ये जावे लागते. मात्र सांगोला तालुक्यात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व मागासवर्गीय मुला-मुलींसाठी पुरेशा प्रमाणात शासकीय वसतिगृहांची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांना राहण्याची मोठी अडचण निर्माण होत आहे. आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक असलेली राहण्याची सोय परवडत नाही आणि त्यामुळे त्यांच्या शिक्षणावर परिणाम होत आहे. शिक्षणाचा प्रसार आणि सामाजिक न्यायाच्या दृष्टीने या घटकांतील विद्यार्थ्यांना सुरक्षित व परवडणारी निवास व्यवस्था उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे सांगोला तालुक्यात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व मागासवर्गीय मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह उभारणे गरजेचे आहे. सबब सांगोला तालुक्यात शासकीय वसतिगृह उभारण्यासाठी योग्य जागा उपलब्ध करून देण्यात यावी तसेच वसतिगृहाच्या बांधकामासाठी राज्य शासनाने आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बापूसाहेब पठारे** |
| (२) | १४४७ | १० | पुणे शहर हे शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. राज्यातून मोठ्या संख्येने विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी पुण्यात येतात. ग्रामीण भागातील अनेक अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना पुण्यात शिक्षण घेताना राहण्याची सोय उपलब्ध नसल्यामुळे त्यांना शिक्षण अर्धवट सोडण्याची वेळ येते. सध्या पुणे शहरातील शासकीय वस्तीगृहांची संख्या अपुरी असल्यामुळे विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | करावा लागत आहे. त्यामुळे वडगाव शेरी मतदारसंघात अनुसूचित जातीतील मुला-मुलींसाठी नवीन शासकीय वस्तीगृह सुरू करणे अत्यावश्यक आहे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | १४४९ | १० | वडगाव शेरी मतदारसंघातील विश्रांतवाडी येथे अनुसूचित जाती व जमातीतील विद्यार्थ्यांसाठी मुला-मुलींचे शासकीय वस्तीगृह कार्यरत आहे. मात्र विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेता अनेक विद्यार्थ्यांना वस्तीगृहात प्रवेश मिळत नाही. परिणामी विद्यार्थ्यांना खाजगी निवासाची व्यवस्था करावी लागते आणि त्यासाठी मोठा आर्थिक भार सहन करावा लागतो. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना अधिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी विश्रांतवाडी येथील विद्यमान वस्तीगृहावर अतिरिक्त मजला बांधून त्याची क्षमता वाढविणे अत्यावश्यक आहे. याकरिता शासनाने तातडीने आवश्यक निधी उपलब्ध करून वस्तीगृहाचा विस्तार करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १२ मार्च, २०२६**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई